**जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची वीज बिले अदा करण्याकरिता रक्कम देणे. . .**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : ग्रापापु-१०९७/प्र.क्र.१६/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २ फेब्रुवारी, १९९८.**

**प्रस्तावना :-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांमध्ये योजना तयार झाल्यानंतर त्या सदोदित कार्यान्वित ठेवून जनतेला पुरेसे व स्वच्छ पाणी कसे उपलब्ध केले जाईल हे पाहण्यासाठी त्या योजनांची निगराणी अव्याहतपणे चालू ठेवण्याकरिता पुरेसा निधीची आवश्यकता असते. ही बाब विचारांत घेऊन शासनाने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत ग्राम पाणी पुरवठा निधी तसेच जिल्हा स्तरावर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६० अंतर्गत जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी स्थापन केला आहे. ग्राम पाणी पुरवठा निधिमध्ये जमीन महसूल अनुदानाचा ३५% हिस्सा तसेच पाणी-पट्टी वा त्या अनुषंगाने जमा होणारी रक्कम टाकली जाते तर जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधीत शासनाकडून देखभाल व दुरुस्तीकरिता मिळणारे अनुदान, जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा किमान २०% हिस्सा तसेच पाणी पट्टी वा त्या अनुषंगाने जमा होणाऱ्या रक्कमा टाकण्यात येतात. त्याशिवाय शासनाकडून वीज बिलावर ५०% अनुदान, टी.सी.एल. पावडर खरेदीवर ५०% अनुदान इ. सवलती दिल्या जातात. प्रत्येक ग्रामपंचायतीने त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजनांवर लागणारा खर्च हा ग्रामपंचायत स्तरावर असणाऱ्या ग्राम पाणी पुरवठा निधीतून भागवावयाचा असतो व असा निधी कमी पडत असल्यास जिल्हा परिषदेकडे जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून निधी मागता येतो. तसेच प्रादेशिक योजनांचे बाबतीत जिल्हा परिषदेने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून खर्च करावयाचा असतो.

२. वरीलप्रमाणे तरतूद असून देखील शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वीज बिलापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची अनेक ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेकडे मोठया मोठया प्रमाणात थकबाकी आहे. सदर थकबाकी ही तातडीने संबंधित ग्राम पंचायत व जिल्हा परिषदांनी अदा करणे आवश्यक आहे.

**परिपत्रक :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेता शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे :-

१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून प्राप्त होणारे चालू बील वेळच्यावेळी अदा करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

२) याशिवाय ग्रामपंचायतीकडे पाणी पुरवठा योजनांची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची असलेली थकबाकी ग्रामपंचायतीनी तातडीने ग्राम स्तरावरील ग्राम पाणी पुरवठा निधीतून अदा करावी.

३) जिल्हा परिषदांनी देखील प्रादेशिक योजनांचे बाबतीत त्यांचेकडे असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वीज बिलाच्या थकबाकीची अदायगी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून तातडीने करावी.

४) थकबाकी असलेल्या योजनांचे थकबाकी अदा करण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा निधी आणि जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी मधून किमान २५% रक्कम वापरावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सु. ल. तिडके)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (वांद्रे) (पुर्व) मुंबई.
५. प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई.
6. निवड नस्ती, का.क्रं.पापु-०७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.